# इंधनाच्या गाड्या शहरात दाखल न होण्याच्या भीतीने पेट्रोल पंपावर वाहन चालकांच्या लागल्या रांगा



**वसई। प्रतिनिधी,**
नवीन मोटर वाहन कायदा विरोधात ट्रक चालकांनी आंदोलन पुकारले आहे. त्याचे पडसाद आता सर्वत्र उमटू लागले आहेत. ट्रक चालक संपावर असल्याने इंधनाच्या गाड्या शहर येणार नाहीत याच भीतीने वसई विरार मधील पेट्रोल पंपावर वाहन चालकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.नुकताच केंद्र शासनाने नवीन मोटार वाहन कायदा आणला आहे. या नवीन कायद्यानुसार दहा वर्षाची शिक्षा व लाखो रुपये दंडांची तरतूद आहे. तसेच हा कायदा आता अजामिनपात्र आहे. या कठोर कायद्याविरोधात ट्रक चालकांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत आंदोलन पुकारले आहे. सोमवारी मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ही हिसंक आंदोलन झाले. अजूनही यावर तोडगा निघाला नसल्याने ट्रक चालक आंदोलन सुरूच आहे. या आंदोलनाचा परिणाम हा मालवाहतूक यासह इतर वाहतुकीवर होऊ लागला आहे.या संपामुळे इंधनाच्या गाड्या शहरात येतील की नाही या भीतीने नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी सायंकाळी वसई विरार मधील पेट्रोल पंपावर मोठी गर्दी झाली होती.वसईच्या स्टेला येथील पेट्रोल पंपावर वाहन चालकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्या रांगा थेट रस्त्यावर आल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण झाले होते.त्यामुळे वाहतूक नियोजन करताना वाहतूक पोलिसांची चांगलीच दमछाक झाली.पेट्रोल पंपावर पेट्रोल भरताना गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले.

# पाताळगंगे'च्या पाण्यासाठी नवी मुंबईचे प्रयत्न; नव्या प्रकल्पांमुळे लोकसंख्येत मोठी वाढ होण्याच्या शक्यतेमुळे जलसंपदा विभागाला पत्र



**नवी मुंबई। प्रतिनिधी,**
नवी मुंबई महापालिकेचे स्वतःच्या मालकीच्या मोरबे धरण असल्यामुळे या शहराला जलसंपन्न शहर म्हणून ओळखले जाते. परंतु परिसरात नवे प्रकल्प येत असल्याने या शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे भविष्यात पाण्याची मागणी वाढणार असल्याने महापालिकेला पाताळगंगा नदीचे पाणी हवे आहे. यासाठी जलसंपदा विभागाकडे पत्रव्यवहार सुरू केला आहे. नवी मुंबई महापालिकेला २०५५ पर्यंत दररोज ९५० एमएलडी पाण्याची गरज लागणार आहे. नवी मुंबई शहराची लोकसंख्या आगामी काळात अनेक पटीत वाढणार असल्याने जलसंपन्न शहराची ओळख कायम ठेवत वाढत्या लोकसंख्येला पुरेसे पाणी उपलब्ध करण्यासाठी महापालिकेकडून आतापासूनच नियोजन सुरू आहे. याद्दष्टीने नवीन जलस्त्रोत शोधण्याकरिता या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची विशेष समितीही स्थापन केली आहे. भविष्यात नवी मुंबई महापालिका क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील १४ गावांचा होणार विकास व त्या भागांतील आगामी लोकसंख्येसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याबाबतही महापालिकेने पाऊले उचलायला सुरवात केली आहे. नवी मुंबई विमानतळामुळेही पाण्याची गरज निर्माण होणार आहे. त्यामुळे जलसंपदा विभागामार्फत २०२१ च्या प्रसिध्द करण्यात आलेल्या पाटबंधारे योजनांबाबत घेतलेल्या माहितीनुसार पाताळगंगा नदीमध्ये पिण्यासाठी पाणी आरक्षण उपलब्ध होऊ शकते. भिरा येथील जलविद्युत प्रकल्पातून कुंडलिका नदीत सोडण्यात येणारे पाणी मिळावे यासाठी सिडको, पनवेल महापालिका आणि नवी मुंबई महापालिकांनी शासनाकडे संयुक्तपणे प्रस्ताव सादर करणेबाबतही तज्ज्ञांच्या बैठकीत झाला होता.

# एपीएमसी- पर राज्यातील आवक घटली; ट्रक चालक संपाचा परिणाम...

**नवी मुंबई। प्रतिनिधी,**
मोटार वाहन कायदा अधिक कठोर केल्याने ट्रक चालकानीं तीन दिवस संप पुकारला आहे. त्याचे परिणाम दिसू लागले असून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत पर राज्यातील आवक घटली आहे. संप असाच राहिला तर निश्चित भाज्यांचे दर कडाडतील अशी भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात दुरुस्ती करीत कायदे कठोर केले. त्यात खास करून अपघात ग्रस्ताला मदत न केल्यास ७ वर्षांची शिक्षा आणि १० लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या विरोधात ट्रक चालकांनी सोमवार पासून देशभरातील तीन दिवसाचा संप पुकारला आहे. याचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंवर पडला असून मुंबई कृषी उत्पन्न बाजार पेठेत पर राज्यातून विशेषतः गुजरात, राजस्थान मध्यप्रदेश कर्नाटक येथून येणारा माल आला नाही.
त्यामुळे पर राज्यातून येणारे गाजर, वाटाणा , फुल कोबी, पत्ता कोबी , फरसबी या भाज्यांची आवक झाली नाही. कांदा बटाटा मध्ये बटाटा आवक नियमित आहे. मात्र कांद्याची आवक घटली असून रोज १०० ते १२० गाड्या येतात मात्र आज केवळ ७० गाड्यांची आवक झाली. विशेष म्हणजे राज्यातील भाज्यांची आवक नियमित आहे मात्र राज्यातील विविध ठिकाणाहून येणार्या कांद्याची आवक घटली आहे. अशी माहिती कांदा बटाटा व्यापारी अशोक वाळुंज यांनी दिली.

# बंदमुळे 'जेएनपीए' परिसरात शुकशुकाट, बंदरातील मालवाहतुकीवर परिणाम



**उरण। प्रतिनिधी,**
'हिट अँड रन' प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षेची तरतूद असलेल्या नवीन कायद्याविरोधात ट्रक चालकांनी सोमवारी अचानक बंद पुकारल्याने सुमारे २५ हजारपेक्षा अधिक वाहने थांबली. त्यामुळे जेएनपीएमधील पाचही बंदरातील मालवाहतुकीवर परिणाम झाला होता. बंदर परिसरातील रस्ते, उड्डाणपूलांवर शुकशुकाट होता. रविवारी सकाळी ११ वाजता शेकडो वाहन चालकांनी जेएनपीए परिसरातील कंटेनर वाहतूक काही काळ रोखून धरली. मात्र, पोलिसांच्या मध्यस्थीने आंदोलनकर्त्यांना समाजवण्यात यश आल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले. परंतु वाहन चालकांनीच वाहने चालविण्यासाठी नकार दिला. त्यामुळे दररोज प्रचंड वर्दळ असलेल्या जेएनपीए बंदरातून होणारी मालाची वाहतूक ठप्प झाली. वाहन चालकांच्या आंदोलनामुळे जेएनपीए बंदरातील कंटेनर मालाची वाहतूकच ठप्प झाल्याने वाहन चालकांशी संवाद साधला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धुमाळ यांनी दिली. आंदोलनाला बहुतांश वाहतूक संघटनांनी पाठिंबा दिला, अशी माहिती न्हावा -शेवा कंटेनर ओनर्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष संजय पोतदार यांनी दिली.

# ठाणे जिल्ह्यात शाळा वाहतूक ठप्प होण्याची भिती; शाळांच्या बसगाड्यांमध्ये दोन दिवस पुरेल इतकाच इंधनसाठा

**ठाणे। प्रतिनिधी,**
'हिट अँड रन प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षेची तरतुद असलेल्या नवीन कायद्याविरोधात देशभरातील ट्रक आणि बसचालकांनी पुकारलेल्या संपामुळे निर्माण झालेल्या इंधन तुटवड्यामुळे ठाणे जिल्ह्यातील शालेय वाहतूक ठप्प होण्याची भिती व्यक्त होत आहे. येत्या काही दिवसांत नऊमाही परिक्षांना सुरुवात होणार असून याच काळात शाळा वाहतूक इंधन अभावी ठप्प होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



ठाणे जिल्ह्यात विद्यार्थ्यांची घर ते शाळा अशी बसगाड्यांमधून वाहतूक होते. काही शाळा स्वतः बसगाड्याचे संचलन करतात. तर, काही शाळांमध्ये खासगी बसगाड्यांमार्फत विद्यार्थ्यांची वाहतूक होते. ठाणे जिल्ह्यात विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी तीन हजाराहून अधिक वाहने आहेत. तर, ठाणे शहरात विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी सातशे ते आठशे वाहने आहेत. यामध्ये छोट्या आणि मोठ्या बसगाड्या, मोटार आणि रिक्षांचा समावेश आहे. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शाळांनी विद्यार्थ्यांना खिसमसची सुट्टी दिली होती. १ जानेवारीपासून शाळा पुन्हा सुरू झाल्या आहेत. पण, इंधन तुटवड्यामुळे शाळा बसवाहतूकदार चिंताक्रांत झाले आहेत.
'हिट अँड रन प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षेची तरतुद असलेल्या नवीन कायद्याविरोधात देशभरातील ट्रक आणि बसचालकांनी संप पुकारला आहे. या संपामुळे इंधन तुटवडा निर्माण झाला आहे. ठाणे जिल्ह्यातील पंपांवर इंधन भरण्यासाठी वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी इंधन संपले आहे तर, काही ठिकाणी इंधनाचा पुरेसा साठा शिल्लक नाही. शाळेच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये दोन ते तीन दिवस पुरेल इतकाच इंधन साठा आहे.

# नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला २९७ मद्यपी वाहन चालकांविरोधात कारवाई



**ठाणे, कल्याण। प्रतिनिधी,**
नववर्ष स्वागत आणि पूर्वसंध्येला मद्य पिऊन वाहन चालविणाऱ्या २९७ जणांविरोधात ठाणे पोलिसांनी कारवाई केली आहे. सर्वाधिक कारवाई भिवंडी आणि ठाणे शहरात करण्यात आली. तसेच वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २९९ वाहन चालकांना दंड आकारण्यात आला आहे. मद्य पिऊन वाहन चालविणाऱ्यांविरोधात न्यायालयात खटले दाखल होणार असल्याचे उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांनी स्पष्ट केले. सरत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाच्या स्वागतासाठी जमणाऱ्या जमावाला नियंत्रणात ठेवण्यासाठी तसेच अनुचित प्रकार घडू नये म्हणून ठाणे पोलिसांकडून दररोज गस्ती आणि चोख बंदोबस्त ठेवला जात होता. असे असले तरी पार्टीनिमित्ताने जाणारे अनेकजण मद्य पिऊन वाहन चालवित असतात. अशा मद्यपी वाहन चालकांमुळे अपघात घडत असतात. हे प्रकार टाळण्यासाठी ठाणे वाहतुक पोलिसांनी ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ८० ठिकाणी ३६ अधिकारी आणि २६४ कर्मचाऱ्यांच्या पथकांनी नाकाबंदी केली होती. ३१ डिसेंबरच्या रात्री आणि १ जानेवारीच्या दिवशी पहाटे पर्यंत कारवाई करण्यात आली. यामध्ये एकूण २९७ वाहन चालकांविरोधात कारवाई करण्यात आली. सर्वाधिक कारवाई भिवंडी, ठाणे शहरात करण्यात आली. ठाणे ते दिवा या क्षेत्रात ९० मद्यपींवर कारवाई झाली. यामध्ये घोडबंदर भागात ३२ आणि वागळे इस्टेटमध्ये १६ मद्यपी वाहन चालकांचा सामावेश आहे. तर भिवंडी शहरात ९४ मद्यपी वाहन चालकांवर कारवाई झाली. यातील सर्वाधिक कारवाई कशेळी, काल्हेर, नारपोली भागात झाली. येथील ५७ मद्यपी वाहन चालकांवर झाली.
डोंबिवली, कल्याण भागातही ६४ मद्यपी वाहन चालकांविरोधात कारवाई करण्यात आली. डोंबिवली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय आफळे, कोळसेवाडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचीन सांडभोर आणि कल्याण वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीश बने यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली. तर उल्हासनगर, विठ्ठलवाडी, अंबरनाथ आणि बदलापूर शहरात ४९ मद्यपींवर कारवाई करण्यात आली. १७ हजार वाहन चालकांवर कारवाई - ठाणे वाहतुक पोलिसांनी २६ ते ३० डिसेंबर या कालावधीत विशेष मोहीम राबविली होती. या दिवसांतही पोलिसांनी कारवाई केली. या कालावधीत मद्य पिऊन वाहने चालविणाऱ्या एकूण ४४६ वाहन चालकांविरोधात कारवाई झाली आहे. तर वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७ हजार वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली.

# कल्याणमध्ये नोकरीचे आमिष दाखवून तरूणाची अकरा लाखाची फसवणूक

**कल्याण। प्रतिनिधी,**
सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यासाठी ११ लाख रुपए भरण्यास सांगून एका तरूणाची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विठ्ठलवाडी येथील तीन जणांच्या विरूध्द कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
प्रकाश मुन्नालाल नेवारे (२८) असे फसवणूक झालेल्या तरूणाचे नाव आहे. तो विठ्ठलवाडी येथील विनायक कॉलनी भागात राहतो. घनश्याम मोहन परब, स्नेहल घनश्याम परब आणि विशाल ढोकळे अशी आरोपींची नावे आहेत. मागील दोन वर्षाच्या कालावधीत ही




फसवणूक करण्यात आली आहे. सरकारी नोकरी मिळवून देतो. आमची वरिष्ठ पातळीवर ओळख आहे, असे सांगून आरोपींची प्रकाशचा विश्वास संपादन केला. सरकारी नोकरी मिळते म्हणून प्रकाश याने आरोपींच्या मागणीप्रमाणे त्यांना रोख, धनादेश आणि ऑनलाईन माध्यमातून दोन वर्षाच्या काळात टप्प्याने अकरा लाख रुपए दिले.
पैसे भरणा केल्यानंतर प्रकाश आरोपींकडे नोकरीचे नियुक्ती पत्र मागु लागला. त्यावेळी ते लवकरच मिळेल. संबंधित अधिकारी रजेवर आहेत. ते आले की तुझे काम होईल, अशी कारणे देऊन वेळकाढूपणा करू लागले. वर्ष होऊन गेले तरी आपणास नियुक्तीचे पत्र मिळत नाही. प्रकाशला आरोपी टाळू लागले. संपकार्ला प्रतिसाद देणे त्यांनी थांबविले. प्रकाश त्यांचा शोध घेऊ लागला तर ते प्रत्यक्ष कोठे भेटत नव्हते. आपली आरोपींनी फसवणूक केल्याची खात्री झाल्यावर प्रकाश नेवारे याने पोलीस ठाण्यात तक्रार केली.

# विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका; मेट्रोची आता ५० स्थानके



**पनवेल। प्रतिनिधी,**
प्रस्तावित विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या मधोमध मेट्रोसाठी मार्गिका तयार करण्यात येत आहे. या मार्गिकेवर पूर्वी ३४ स्थानके प्रस्तावित होती. ही संख्या आता ५० पेक्षा अधिक होणार आहे. यासाठी अभ्यासगट नेमण्यात आला आहे, अशी माहिती मुंबई महानगर रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) सूत्रांनी दिली. सुधारित प्रस्तावानुसार नायगाव ते अलिबागपर्यंत (बलावली) ही मेट्रो धावणार आहे. यापूर्वी खारबाव ते अलिबाग (बलावली) दरम्यान मेट्रो प्रस्तावित होती. यादरम्यान ३४ स्थानके होती. विरार-अलिबाग बहुउद्देशीय महामार्गासाठी २०१० मध्ये १० हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. मात्र, १३ वर्षांनंतर याच महामार्गिकेसाठी एमएसआरडीसी ह्युडकोकडून कर्ज घेऊन ही मार्गिका ५२ हजार कोटी रुपयांना बांधत आहे. या मार्गिकेच्या द्रुतगती मार्गाचे बांधकाम सुरुवातीच्या चार वर्षांत पूर्ण केल्यानंतर मेट्रोच्या कामाला सुरुवात करण्याचे उद्दिष्ट एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांचे आहे. भूसंपादनासाठी १८ हजार कोटी आणि बांधकामासाठी २० हजार कोटी रुपयांहून अधिक तसेच इतर कामांसाठी १४ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे.
विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेवरील प्रस्तावित मेट्रो ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबईच्या मेट्रो मार्गिकेला जोडण्यात येणार आहे. प्रत्येक ३ ते ४ किलोमीटरवर मेट्रोचे स्थानक प्रस्तावित केले आहे. पनवेल तालुक्यामध्ये नांदगाव, करंजाडे, कोंडले आणि रिटघर या गावांच्या मध्ये या मेट्रोची स्थानके प्रस्तावित आहेत. या मार्गिकेवर पूर्वी ३४ स्थानके प्रस्तावित होती. ही संख्या आता ५० पेक्षा अधिक होणार आहे. याबाबत एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्याशी संपर्क साधला, मात्र त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.
भूसंपादन कागदावरच...
या मार्गिकेचा सर्वाधिक लाभ सिडकोच्या नैना प्रकल्पाला मिळणार आहे. न्हावा शेवा-शिवडी सागरी मार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-गोवा महामार्गांना हा मार्ग जोडला जाणार आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यातील ६८ गावांपैकी २८ गावांची जमीन दरनिश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

# नगररचना अधिकाऱ्यांची 'एसआयटी'कडून चौकशी



**कल्याण। प्रतिनिधी,**
डोंबिवलीत ६५ बेकायदा इमारती उभारून या इमारतींना महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचा (महारेरा) नोंदणी क्रमांक मिळवून या बेकायदा इमारती मधील सदनिका विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विकासक, वास्तुविशारद आणि जमीन मालकांच्या विरुध्द मागील वर्षी कल्याण डोंबिवली पालिकेने केलेल्या तक्रारीवरून मानपाडा, रामनगर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणात कल्याण डोंबिवली पालिकेच्या नगररचना विभागाची भूमिका समजून घेण्यासाठी ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाने नगररचना अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे. ६५ बेकायदा इमारतींवर कल्याण डोंबिवली पालिकेने काय कारवाई केली.
या इमारतींमधील सदनिका विकासकांनी ग्राहकांना विकल्या आहेत का? या इमारती पालिकेकडून जमीनदोस्त का केल्या जात नाहीत? याची चौकशी करण्यासाठी पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडून लवकरच पालिकेचे अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त आणि डोंबिवलीत ज्या ग, ह आणि ई प्रभागात या बेकायदा इमारती माफियांनी उभारल्या आहेत. त्या संबंधित अधिकाऱ्यांना चौकशीसाठी बोलविण्यात येणार आहे, असे 'एसआयटी'च्या एका वरिष्ठ सुत्राने सांगितले.

# अवजड वाहनांच्या आंदोलनाचा पनवेल परिसराला फटका



**मुंबई। प्रतिनिधी,**
पनवेल तालुक्यामध्ये ४० पेट्रोलपंप आहेत. अवजड वाहनचालक मालकांनी घेतलेल्या आंदोलनाच्या पवित्र्यामुळे दूस-या दिवशी पेट्रोलपंपांवर काही ठिकाणी डीझेल संपले तर पेट्रोल आज पुरेल एवढेच होते. इंधन संपेल आणि आंदोलन अजून काही दिवस राहील या भितीने दुचाकी चारचाकी वाहनांनी इंधन वाहनात भरण्यासाठी एकच झुंबड केल्याचे प्रत्येक पेट्रोलपंपात दिसत होते. पनवेल येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसआगारामधील डीझेलपंपामध्ये ३ हजार लीटर इंधन होते. एका दिवसाला पुरेल एवढाच साठा असल्याने साठा मिळाला नाही तर एसटी धावण्यासाठी राज्य परिवहन मंडळाचे अधिकारी नियोजन करताना दिसत होते. पनवेलच्या कृषी उत्पन्न बाजारामध्ये मंगळवारी पहाटे नियमीतप्रमाणे ३३ वाहने भाजीपाला घेऊन आल्या.
मात्र आंदोलनाची हीच स्थिती राहील्यास पनवेलमध्ये भाज्यांची आवक कमी होण्याची भिती बुधवारपासून व्यक्त केली जात आहे. आंदोलनामुळे अवजड वाहने पनवेलच्या रस्त्यावरुन कमी धावत असल्याने रस्त्यावर शुकशुकाट होता.
ज्या घरांमध्ये वाहिनीतून थेट घरगुती गॅसचा पुरवठा होतोय अशा घरांना गॅस पुरवठा करण्यास कोणताही अडथळा नव्हता. मात्र बाटलीबंद घरगुती गॅसच्या पुरवठा करणारी अवजड वाहनांची आवक कमी होत असल्याने याचा मोठा फटका बसेल अशी भिती पुरवठा विभागाकडून व्यक्त केली जात होती. कोणत्याही स्तरावर घरगुती गॅस आणि पेट्रोलपंपांना इंधनाचा तुटवडा कमी येऊ नये म्हणून रायगड जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी पोलीस प्रशासनाला नियोजनासाठी आदेश दिले आहेत. तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये मंगळवारी अवजड वाहनांची वर्दळ तुरळक दिसत होती. बाहेरील जिल्ह्यातून आणि राज्यातून येणा-या वाहनांचे प्रमाण कमी होते.

# डोंबिवलीत कुंभारखाणपाडा येथे खारफुटीच्या जुनाट झाडांची कत्तल; तोडलेल्या झाडांच्या जागेवर आठ माळ्याची बेकायदा इमारत



**डोंबिवली। प्रतिनिधी,**
डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा येथील खाडी किनारी भागातील जुनाट खारफुटीची झाडे तोडून एका आठ माळ्याच्या बेकायदा इमारतीचे बांधकाम भूमाफियांनी पूर्ण केले आहे. महसूल, पालिका अतिक्रमण नियंत्रण आणि ह प्रभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांचे या खारफुटी तोडीकडे लक्ष नसल्याने पर्यावरणप्रेमी नागरिक तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. डोंबिवली पश्चिमेत कुंभारखाणपाडा, देवीचापाडा, मोठागाव रेतीबंदर, कोपर आणि आयरे हा एकमेव हरितपट्टा शिल्लक आहे. या हरितपट्टयात भूमाफियांनी खाडी किनारच्या भागात माती, दगडाचे भराव देऊन बेसुमार बेकायदा चाळी उभारणीचे काम सुरू केले आहे. ह प्रभाग हद्दीत उल्हास खाडी किनाऱ्या लगतच्या कुंभारखाणपाडा भागात यापूर्वीच १० बेकायदा इमारतींचा गृहप्रकल्प सुरू आहे. १२ एकर जागेत काटईच्या एका इसमाने बेकायदा इमारत उभारणीचे काम सुरू केले आहे, अशा तक्रारी आहेत. खंडोबा मंदिराच्या मागील बाजूस खारफुटीची जुनाट झाडे आहेत. विविध पक्ष्यांचा अधिवास या झाडांवर होता. निसर्ग छायाचित्रकार यांचे हे भ्रमंतीचे ठिकाण आहे.
भूमाफियांनी या भागातील खारफुटीची जुनाट झाडे तोडून टाकली आहेत. या मोकळ्या जागेवर पालिकेला अंधारात ठेऊन आठ माळ्याची बेकायदा इमारत उभारली आहे. खाडी किनारी निसर्गरम्य वातावरणात ही इमारत असल्याने याठिकाणी सदनिका खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना भूमाफिया या इमारतीला महारेराचा नोंदणी क्रमांक, ही इमारत कल्याण डोंबिवली पालिकेच्या बांधकाम परवानग्या घेऊन उभारण्यात आली आहे, अशी खोटी माहिती देऊन दिशाभूल करत आहेत, अशा तक्रारी आहेत. या इमारतीच्या चारही बाजुने बांधकाम पूर्ण होईपर्यंत हिरवी जाळी लावण्यात आली होती. ती जाळी आता सदनिका खरेदीदारांनी या इमारतीकडे आकर्षित व्हावे यासाठी काढून टाकण्यात आली आहे. पावसाळ्यात कुंभारखाणपाडा खाडी किनारा परिसरात जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसतो.
अशा जागेत या इमारतींची उभारणी करून भूमाफियांनी नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक सुरू केली आहे.

# नाट्य, कलासंस्कृतीला उभारी; ठाण्यातील नाट्यगृहांच्या भाडेदरात कपात; नववर्षी नाट्यसंस्थाना दिलासा



**ठाणे। प्रतिनिधी,**
मराठी नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उभारी मिळावी या उद्देशातून ठाणे महापालिकेने मराठी भाषेतील कार्यक्रमांसाठी राम गणेश गडकरी रंगायतन आणि डॉ, काशीनाथ घाणेकर या दोन्ही नाट्यगृहातील भाडे दरात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भाडे दरात निम्म्यापेक्षा जास्त कमी झाल्याने नाट्य तसेच विविध संस्थांना नव्या वर्षात भाडे कपातीचा दिलासा मिळाला आहे. मुंबई आणि नवी मुंबईतील नाट्यगृहांच्या तुलनेत भाडेदर जास्त असल्यामुळे ठाणे महापालिकेने ही भाडेदर कपातीचा निर्णय घेतला असून या निर्णयाची अंमलबजावणी १ जानेवारीपासून सुरू करण्यात आली आहे. ही सवलत घेऊन इतर कार्यक्रम केले तर १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.
ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागात राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृह आहे. तर, नवे ठाणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घोडबंदर भागात डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह आहे. शहराचा मानबिंदू असलेली ही दोन्ही नाट्यगृहे सांस्कृतिक चळवळीचे केंद्रबिंदू म्हणून परिचित आहेत. गडकरी रंगायतन नाट्यगृहाची आसन क्षमता १०५६ इतकी आहे. घाणेकर नाट्यगृहाची १०९५ तर, येथील लघु सभागृहाची क्षमता १८२ इतकी आहे. या नाट्यगृहांमध्ये शनिवारी आणि रविवार या सुट्टीच्या दिवशी पाच हजारांच्या आसपास प्रेक्षक येतात. या दोन्ही नाट्यगृहातील भाडे दर मुंबई आणि नवी मुंबई महापालिका नाट्यगृहाच्या तुलनेत दुप्पट आहे. रविवारच्या दिवशी हे भाडे अधिक असते. रविवारच्या दिवशी वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहाचे भाडे वस्तु व सेवा करासहित ९ हजार ५०० रुपये इतके असते. याच दिवशी ठाण्यातील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहाचे भाडे वस्तु व सेवा करासहित ३७ हजार ५०० रुपये तर, गडकरी रंगायतनचे भाडे वस्तु व सेवा करासहित २६ हजार ४०० इतके असते.
हे भाडे दर कमी करण्याची मागणी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि जागतिक मराठी नाट्यधर्मी निमार्ता संघ या संस्थांनी काही महिन्यांपुर्वी केली होती. ही मागणी मान्य करत ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी भाडे दरात निम्म्यापेक्षा जास्त कपात केली आहे. सर्व संस्था, सामाजिक संस्था, राजकीय पंक्षाचे कार्यक्रम, शाळा महाविद्यालयीन कार्यक्रम विना तिकीट असतील तर त्यांना १२ हजार ५०० भाडे भरावे लागणार असून हे दर पुर्वी इतकेच आहेत.

